# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांकः14.08.2026** **वारःशुक्रवार**

---

1. 80व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशाला संबोधित करणार,
2. संसदेचं पावसाळी अधिवेशनअनिश्चित काळासाठी संस्थगित,
3. नदी जोड प्रकल्पामुळे राज्य दुष्काळमुक्त होण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विश्वास,
4. राज्यातील पहिल्या आदर्श मुद्रांक आणि नोंदणी कार्यालयाचं पुण्यात उद्घाटन आणि,
5. राष्ट्रपतींच्या हस्ते संगीत नाटक अकादमीचे सन्मान प्रदान, राज्यातल्या 10 कलावंतांचा गौरव.

**<u>राष्ट्रपती-अभिभाषण</u>**

देशाचा 80वा स्वातंत्र्यदिन उद्या साजरा होणार आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आज संध्याकाळी सात वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राष्ट्राला संबोधित करणार आहेत. राष्ट्रपतींचं हे संबोधन आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून तसंच दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून प्रसारित केलं जाईल सुरुवातीला हिंदीतून आणि त्यानंतर लगेचच इंग्रजी भाषेतून हे भाषण प्रसारित केलं जाणार आहे. त्यामुळे मुंबई केंद्रावरून संध्याकाळी सात वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज संध्याकाळी पावणे सात वाजता प्रसारित केलं जाईल.

**<u>स्वातंत्र्यदिन</u>**

स्वातंत्र्यदिनानिमित्त राजधानी दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या सकाळी 7 वाजता ध्वजारोहण होणार आहे. त्यांनतर पंतप्रधान राष्ट्राला संबोधित करतील. ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाचं थेट प्रसारण आकाशवाणीवरून करण्यात येणार आहे. या मुळे उद्या सकाळी आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या प्रादेशिक बातम्या सकाळी 6 वाजून 40 मिनिटांनी प्रसारित होतील.

**<u>स्मृति दिन</u>**

विभाजन विभीषिका स्मृति दिन देशभरात आज पाळला जात आहे. 1947 मध्ये देशाची फाळणी झाली; फाळणीच्या वेळी मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी तसंच फाळणीच्या घटनेच्या वेदनांबाबत नव्या पिढीला माहिती व्हावी यासाठी 2021 पासून दरवर्षी 14 ऑगस्ट हा दिवस विभाजन विभीषिका स्मृति दिन पाळला जातो.

**<u>संसद</u>**

संसदेचं पावसाळी अधिवेशन काल अनिश्चित कालावधीसाठी संस्थगित करण्यात आलं. या अधिवेशनाच्या काळात एकंदर 12 विधेयकं मान्य करण्यात आली.

विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून घातलेल्या गदारोळामुळे कामकाजात वारंवार व्यत्यय आला. अधिवेशनात लोकसभेत 19 टक्केतर राज्यसभेत 39 टक्के कामकाज झालं. विरोधकांच्या या वर्तणुकीबद्दल राज्यसभेचे अध्यक्ष सी पी राधाकृष्णंन यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

अधिवेशनानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत संसदीय कामकाज मंत्री किरेन रीजीजू यांनी विरोधकांवर टीका केली. सरकार चर्चेला तयार असूनही विरोधकांनी केवळ गोंधळ घातला; या वर्तनातून विरोधकांची पराभूत मानसिकता स्पष्ट होते, असं रीजीजू म्हणाले.

**नदीजोड प्रकल्प**

एकात्मिक जल व्यवस्थापनाच्या माध्यमातून सर्व राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी नदीजोड प्रकल्प राबवण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या 21व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. नदीजोड प्रकल्पाला सीडब्ल्यूसीची मान्यता मिळाल्यानंतर याच वर्षी किंवा पुढच्या वर्षाच्या सुरुवातीला प्रकल्पाचं काम सुरू करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. यावेळी माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड आणि प्राधिकरण यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला.

**बावनकुळे**

नागरिकांना मुद्रांक आणि नोंदणी विभागाच्या सेवा अधिक सुलभ, पारदर्शक, आधुनिक आणि दर्जेदार पद्धतीनं उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील पहिलं आदर्श मुद्रांक आणि नोंदणी कार्यालय पुण्यात सुरू करण्यात आलं आहे. राज्यातील नोंदणी कार्यालयं आधुनिक आणि नागरिकाभिमुख करण्याचं मुख्यमंत्र्यांचं उद्दिष्ट आहे; त्यादिशेनं हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सांगितलं. "एक जिल्हा एक नोंदणी"मुळे नागरिकांना मोठी सुविधा मिळाली असल्याचंही बावनकुळे यांनी यावेळी बोलताना सांगितलं. महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते कोथरूड इथं या कार्यालयाचं काल उद्घाटन करण्यात आलं. नोंदणीकृत दस्तऐवज, सूची क्रमांक 2 आणि विवाह प्रमाणपत्रांच्या डिजिटल स्वाक्षरीयुक्त प्रमाणित प्रती नागरिकांना घरबसल्या ऑनलाइन उपलब्ध करून देणाऱ्या 'ई-प्रमाण' प्रकल्पाचाही राज्यव्यापी शुभारंभ देखील काल बावनकुळे यांच्या हस्ते पुण्यात करण्यात आला. यावेळी बावनकुळे यांनी नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक कार्यालय तसंच जमाबंदी विभागाच्या विविध कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

**जमीनहक्क-बावनकुळे**

शेतकऱ्यांच्या जमीन हक्कांचं संरक्षण तसंच भूसंपादनातील वाद कमी करणे आणि मालमत्ता नोंदणी प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी राज्य सरकार विविध निर्णय घेत असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली.

प्रत्यक्ष ताबा आणि वहिवाट असूनही सातबारा किंवा प्रॉपर्टी कार्डवर नाव नसलेल्या सुमारे 2 लाख 31 हजार शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्यासाठी विशेष योजना राबवण्यात येणार असल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

**राज्य सहकारी बँक**

राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला 5 हजार कोटी रुपयांचं भांडवली कर्ज मंजूर करण्यात आलं आहे. महामंडळाकडून एवढ्या मोठ्या रकमेचं कर्ज मंजूर होणारी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ही देशातील पहिली सहकारी बँक ठरली आहे. या निधीचा वापर सभासद सहकारी संस्थांना पुढील कर्जपुरवठ्यासाठी करण्यात येणार असून, त्याचा व्यापक लाभ सहकार क्षेत्राला होईल, असं महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितलं.

**संगीत नाटक अकादमी**

भारतीय कला आणि सांस्कृतिक क्षेत्रात राज्याची समृद्ध परंपरा अधोरेखित करणाऱ्या दहा मान्यवर कलावंतांचा काल संगीत नाटक अकादमी पुरस्कारानं राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत वर्ष 2024 आणि 2025 चे संगीत नाटक अकादमी सन्मान प्रदान करण्यात आले.

एकंदर 115 मान्यवर कलाकारांचा काल सन्मान करण्यात आला. मनीषा साठे, आनंद भाटे, अरुण नलावडे, अशोक पत्की, अरुण कशाळकर, मुकुंद मराठे, सुभाष नकाशे, शुभदा वरदकर, शैलेश भागवत, आणि प्रमोद पवार या राज्यातल्या कलावंतांना हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोख रक्कम, ताम्रपत्र आणि शाल असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

**<u>नांदी संमेलन</u>**

पुढच्या वर्षी पुण्यात होणाऱ्या 100 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर 99 नांदी संमेलनं आयोजित केली जाणार आहेत. या श्रृंखलेतील पहिलं नांदी संमेलन आज पुण्यात होणार आहे. पुण्यातील हिराबागेत 1878 मध्ये पहिल्यांदा न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पहिली ग्रंथकार सभा बोलावली गेली; त्याच ठिकाणी म्हणजे ज्योत्स्ना भोळे सभागृहात हे संमेलन होणार आहे. केवळ निमंत्रितांसाठी आयोजित या संमेलनात पहिल्या ग्रंथकार संमेलनाचं दृश्य नाट्यरूपात सादर केलं जाणार आहे. त्यानंतर शतायुषी विद्वजन यास्मिन शेख आणि शि. द. फडणीस यांचा आणि शताब्दी पूर्ण केलेल्या 15 संस्थांचा गो. बं. देगलूरकर यांच्या हस्ते सत्कार केला जाणार आहे. या कार्यक्रमात महात्मा ज्योतिबा फुले यांच्यावरील सत्यशोधक महात्मा या दीर्घांकाचं सादरीकरणही होणार आहे.

**<u>स्मार्ट कार्ड</u>**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवाशांना सुलभ, सुरक्षित आणि डिजिटल प्रवासाचा अनुभव देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या एनसीएमसी स्मार्ट कार्डला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. राज्यात सुमारे सुमारे 65 लाख कार्डे सक्रिय झाली आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. येत्या 15 ऑगस्टपासून सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्डच्या नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. प्रत्येक शाळेत जाऊन ही प्रक्रिया करण्यात येणार असून विद्यार्थ्यांनी यासाठी इतर कोणत्याही ठिकाणी नोंदणी करू नये, असं आवाहन एसटी महामंडळानं केलं आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी येत्या 1 सप्टेंबरपासून एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे.

**<u>सुखबीर सिंह बादल</u>**

पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि अकाली दलाचे नेते सुखबीर सिंह बादल यांच्यावर काल नांदेड जिल्ह्यातल्या मुदखेड तालुक्यात मातासाहेब गुरुद्वारा इथं हल्ला झाला. बादल यांच्यावर नांदेड शहरातल्या एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी या घटनेनंतर एका व्यक्तीला अटक केली. जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी मातासाब गुरुद्वारा इथं भेट देऊन माहिती घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बादल यांच्या पत्नी खासदार हरसिम्रत कौर बादल यांच्याशी संवाद साधला आणि बादल यांच्या प्रकृतीची चौकशी केली. या हल्ल्याची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात आज तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.